मंगळवार, दि. ८ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३३२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ‘आंखे तो खोलो स्वामी’

## शहरातील नागरी समस्यांवरून शिवसेना ठाकरे गटाचे अनोखे आंदोलन; समस्यांची चित्रफित मनपा आयुक्तांच्या दालनात



समस्यांची चित्रफित आयुक्तांना दाखविण्यात आली. मनपा आयुक्तांनीही शांततेत काही काळ खाली मान घालून चित्रफित पाहिली.





**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील नागरी समस्यांवरून शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला आहे. येथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जालना शहर महानगर पालिकेविरोधात ‘आँखे तो खोल स्वामी’ असे अनोखे आंदोलन करण्यात आले. शहरात मोकाट कुत्र्यांच्या मुद्द्यासह शहरातील पाणी प्रश्न, मोकाट जनावरे अशा विविध नागरी समस्यांच्या प्रश्नावर शिवसेनेच्या वतीने अनेकवेळा आंदोलन करण्यात आली अनेक वेळा निवेदनही देण्यात आली. मात्र समस्या काही सुटत नसल्याने समस्याचं शहरातील चित्र जैथेच असल्याचं बघायला मिळत आहे. आंदोलनाकडे डोळेझाक करणाऱ्या म नपा आयुक्त तथा प्रशासक व स्वामींच्या भूमिकेत असलेल्या आयुक्तांना चित्रफित दाखवून ‘आँखे तो खोलो स्वामी’ आंदोलन करण्यात आले आहे.

जालना शहरात घाणीचे साम्राज्य पसरले असून शहरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट वाढल्याच पाहायला मिळत आहे. तसेच शहरात अनेक भागांत रस्त्याच्या मधोमध विद्युत खांब उभे आहेत. ते अद्याप हटवण्यात आलेले नाहीये. याचबरोबर शहराला नियमित पाणी पुरवठा देखील केला जात नाही. त्यामुळे या सर्व प्रश्नांवरून आक्रमक होत आज शिवसेना ठाकरे गटाने महापालिका कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत शहरातील नागरी समस्या तातडीने सोडवण्याची मागणी ठाकरे गटाने महापालिका आयुक्तांकडे केलीय. दरम्यान, जर लवकरात लवकर नागरी समस्या सोडवल्या गेल्या नाहीत, तर शिवसेना स्टाईल आंदोलन करू असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

या आंदोलनादरम्यान आयुक्तांच्या दालनात जाऊन शिवसेना पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांना त्यांच्या समोर असलेल्या स्क्रिनवर शहरातील समस्यांची चित्रफीत दाखवली. या चित्रफीतीतून शहरातील समस्या मांडत शिवसेनेने आंदोलन केले. आंदोलनादरम्यान पदाधिकाऱ्यांनी महापालिकेच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत महापालिका आयुक्तांनी डोळे उघडे ठेवून नागरी समस्या सोडवण्याची मागणी केली. चित्रफित पाहतांना मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांनी अनेक वेळा खाली मान घातलेली पहायला मिळाली. आता तरी मनपा आयुक्त शहरातील **पान २ वर**

युवा आदर्श

नवा फंडा ...

गोड नाव धर्मादाय
स्थापन करता फंडा
झटपट माया जमा
तेजीत आला फंडा
लोकोपयोगी संस्था
जनता सेवार्थ झेंडा
संस्थासदस्य करावे
रे बड्या बड्या धेंडा
ऋग्ण हितार्थ सत्कर्म
जाहीर बांधावे गंडा
भोळ्या दान शूरांना
सहज घालावा गंडा
प्रारंभी निष्काम सेवा
भरावा विश्वास हंडा
प्रसंगी पदरमोड करे
पायपीट करत हिंडा
गरजूंना सहाय्य करी
प्रदर्शन बाजार मांडा
इन्कम टॅक्स सूट घ्या
फसवण्या हातखंडा
बोलणाऱ्यांचा सहज
विकला जातो कोंडा
नवसाले त्वरित पावे
शेंदूर फासलेला धोंडा
डिग्री धारका फसवी
नमन अशिक्षीतगुंडा
मिरव सांगत फसगत
जाणले नाही कुभांडा

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

# आमसभेच्या विषय पत्रिकेत विषय नसतांना घेतले बोगस ठराव

### जालना व बदनापूर तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील प्रकार; जिल्हा उपनिबंधकांकडे तक्रार

**जालना । प्रतिनिधी -** जालना व बदनापूर तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या जालनाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कर्मचारी सेवा नियम उपविधी दुरुस्ती, तसेच कर्मचारी सेवा सातत्य बाबत आम सभेच्या विषय पत्रिकेत विषय नसतानाही बोगस ठराव घेतले गेले असल्याची तक्रार जिल्हा उपनिबंधकांकडे पतसंस्थेच्या सभासदांनी केली आहे.

या संदर्भात दिलेल्या तक्रारी निवेदनात म्हटले आहे की, जालना व बदनापूर तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था जालना या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ११/०८/२०२४ रोजी पार पडली. या सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने प्रकाशित केलेल्या वार्षिक अहवालात कर्मचारी सेवा नियम उपविधी दुरुस्तीबाबत कोणताही ठराव आमसभे समोर चर्चेसाठी ठेवण्यात आलेला नव्हता. तसेच प्रस्तावित पोटनियम दुरुस्ती विषयी संस्थेने प्रकाशित केलेल्या वार्षिक अहवालात सुद्धा कुठेही त्याची नोंद केलेली नव्हती. असे असतानाही सत्ताधारी संचालक मंडळाने वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त जिल्हा निबंधकाकडे मंजुरीसाठी सादर करताना त्यामध्ये बोगस ठराव घुसवले आहेत.

त्यातून २०२२ मध्ये झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील कर्मचारी सेवा नियम उपविधी दुरुस्तीला बदलण्यात आले आहे. २०२२ मधील केलेल्या कर्मचारी सेवा नियम दुरुस्तीप्रमाणे... कर्मचाऱ्याचे पद रिक्त झाल्यावर त्याबाबत नवीन नियुक्ती करताना करार व मानधन तत्वावर नियुक्त करण्यात येईल हा पूर्वीचा नियम रद्द करून कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्यानंतर सहा महिन्यासाठी करार पद्धती असेल त्यानंतर त्यांचे काम पाहून नियमित वेतनश्रेणी म्हणजे सेवा सातत्य दिले जाईल. असा बोगस ठराव आमसभेत घेतला असल्याची माहिती जिल्हा निबंधकाकडे दिलेली आहे. वास्तविक पाहता अशा प्रकारचा कोणताही ठराव ऑगस्ट २०२४ मधील ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत झालेला नव्हता.

आमसभेपूर्वी प्रकाशित केलेल्या वार्षिक अहवालातील विषय पत्रिका, संचालक मंडळाच्या बैठकीत सुद्धा याविषयी कोणताही ठराव आलेला नव्हता. केवळ नोकर भरती समितीने केलेल्या शिफारशीवर चर्चा या पलीकडे काहीही विषय पत्रिकेत नमूद केलेले नव्हते. त्यामुळे हे सर्व बोगस ठराव संस्थेच्या आर्थिक हिताच्या विरोधात आहेत.

याशिवाय २०२२ मध्ये जालना व बदनापूर जि प शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या झालेल्या **पान २ वर**

### आषाढी एकादशी आणि गुरुपौर्णिमेनिमित्त भक्तिसंगीताचा अनोखा सोहळा

# जेईएस मध्ये बुधवारी ‘बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल’ कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** भक्तिरसात न्हालेल्या आषाढी एकादशी आणि गुरुपौर्णिमेच्या पवित्र पूर्वसंध्येच्या निमित्ताने, जालना शहरातील संगीत आणि भक्तिकला प्रेमींसाठी ‘बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल’ एक अनोखा भक्तिसंगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कलावर्धिनी जालना आणि जेईएस महाविद्यालयाचा ललित कला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या चुन्नीलाल गिरीलाल सभागृहात बुधवार(दि. ९) बुधवारी रोजी सायंकाळी ६:०० वाजता या भक्तिमय सोहळ्याला प्रारंभ होईल. या कार्यक्रमात अनेक नामांकित कलाकार यामध्ये सहभागी होणार असून प्रमुख सादरकर्ते म्हणून डॉ. मोहिनी रायबागकर, प्रा. शाहीर कल्याण उगले, शाहीर माधवी माळी उगले, तसेच तबलावादनात कुशलता प्राप्त जय कराड यांचे मनोहारी सादरीकरण रसिकांच्या अनुभवास येणार आहे. विशेष म्हणजे लोककला विभागातील सर्व विद्यार्थीही विविध भक्तिगीते सादर करणार आहेत. यामध्ये शोहेब शेख, हरेश उगले,आदित्य मुदीराज, प्रतीक साळुंखे,ज्ञानेश उगले, आनंद घुले,ओंकार सुलाखे, सोहम उगले व गणेश साळवे यांचा या कार्यक्रमात सहभागी आहे

कार्यक्रमाचे निरूपण कवी, गीतकार आणि अभिनेते विनोद जैतमहाल करणार आहेत. विठ्ठल भक्तीची परंपरा, अभंग व लोकसंगीताच्या गजराच्या माध्यमातून संतांच्या भक्तिसंगीताचा अनुभव देणारा हा कार्यक्रम आहे.

विठ्ठल नामाचा जयघोष, संतांच्या ओव्या-अभंगांचा गजर आणि जीवनमूल्यांची शिकवण देणारी गुरुपौर्णिमा यांचे सुरेख संगम ‘बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल’ या कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे.

हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून, जालना शहरातील सर्व रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तीमय वातावरणात सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले आहे.

**कलावर्धिनी जालनाच्या उद्घाटनपूर्व नांदी :**



जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या पुढाकाराने 'कलावर्धिनी' हा जालना शहरातील कलावंतांचा एक नवा समूह सुरू करण्यात आला आहे. जालना शहरातील रसिकांची सांस्कृतिक भूक भागवण्यासाठी हा समूह स्थापन करण्यात आला आहे.

या अंतर्गत वर्षभरात ६ कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे, ज्यात सुगम आणि शास्त्रीय संगीत मैफिली, नाट्य महोत्सव, लोककला महोत्सव आणि मराठी-हिंदी गीतांचा वाद्यवृंद यांचा समावेश आहे. या समूहासाठी सदस्य नोंदणी सुरू झाली आहे. फक्त २०० सदस्यांची नोंदणी केली जाणार असून, नोंदणीसाठी डॉ. मोहिनी रायबागकर किंवा डॉ. बाबासाहेब वाघ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जालना प्रशासनात चांगल्या अधिकाऱ्यांची गरज - अ‍ॅड. धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात भु-घोटाला व ईतर घोटाळे समोर येत आहेत. अनेक महसुल खात्यातील लोकांना निलंबीत करुन देखील लोकांचे काम होत नाहीत. खरेदीखत आधारे नामांतर होत नसल्याने मा. लोकआयुक्त यांनी जिल्हा प्रशासनावर प्रलोभनापोटी जाणुन-बुजुन नामांतर होत नसल्याबद्दल टिका केलेली आहे व राज्यापालाकडे सुद्धा या संदर्भात शिफारस करुन महसुल अधिकाऱ्यावर कारवाई करणे बाबत सांगीतले आहे. मंठा येथे खरेदीखत आधारे नामांतर होत नाही व जालना जिल्ह्यात सुद्धा या संदर्भात व विविध विभागासंदर्भात अनेक तक्रारी देऊन व जिल्हाधिकारी यांनी संबंधीत विभागाला पत्र देऊन देखील संबंधीत विभाग त्या पत्राला दुजोरा देत नाही व फक्त प्रशासकीय खर्च वाढतच आहे. अनुदान घोटाळा व बोगस पी. आर. संदर्भात अद्यापही कोणत्याही उच्च अधिकाऱ्याने स्वतः हुन जबाबदारी घेत राजीनामा दिलेला नाही. जालना येथुन प्रशासकीय निष्काळजीपणा तथा भ्रष्टाचारामुळे लोकांचे काम होत नसल्याने अदानी समुहाचा जो २००० कोटीचा लॉजीस्टीक पार्क जालना येथे उभारला जाणार होता, तो सुद्धा रद्द झाल्याची बातमी वर्तमान पत्रात झळकली आहे. एकीकडे शेतकऱ्यांच्या आंदोलनाकडे व समस्याकडे जालना प्रशासन दुर्लक्ष करीत आहे तर दुसरीकडे भ्रष्टाचाराकडे लक्ष देऊन स्वतःची कमाई करत आहे. त्यामुळे प्रशासनात चांगल्या अधिकाऱ्यांची गरज भासत आहे. आता अधिवेशनात या मुद्यावर स्थानिक नेत्यांनी आवाज उठविणे गरजेचे असल्याचे मत अ‍ॅड. महेश धन्नावत, कार्याध्यक्ष नोटरी असोसिएशन जालना यांनी व्यक्त केले.

# हा कोणता आदर्श निर्माण करताहेत सुपरस्टार

## अभिनेते म्हणतात गुटखा खा तर क्रिकेटर म्हणतात जुगार खेळ...!

आपल्या देशात जर सर्वाधिक ( चाहते ) फॅन फॉलोअर्स कोणाचे असतील तर ते चित्रपटात काम करणारे अभिनेते आणि क्रिकेट खेळणाऱ्या क्रिकेट खेळाडूंचे. कारण चित्रपट आणि क्रिकेट हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सिनेमा आणि क्रिकेट शिवाय भारतीयांचे जीवन अपूर्ण आहे. एकप्रकारे सिनेमा आणि क्रिकेट हे भारतीयांचे श्वास आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. क्रिकेट तर आपल्याकडे धर्म मानला जातो आणि काही प्रेक्षक चित्रपट अभिनेत्यांना देव मानून त्यांची पूजा करतात. दक्षिणेत तर अनेक अभिनेत्यांची मंदिरे देखील उभारुन त्यांची पूजा केली जाते. भारतीयांच्या दृष्टीने चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर म्हणजे सर्वस्व म्हणूनच त्यांचे लाखो चाहते आपल्या देशात आढळतात. विशेषतः तरुण वर्ग तर चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांना आपला आयडॉल मानतात. त्यांच्या प्रमाणे दिसायचा, वागायचा, वेशभूषा, केशभूषा करण्याचा प्रयत्न करतात. हे सिलिब्रेटी सांगतील त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न तरुण वर्ग करत असतो त्यामुळे चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांची जबाबदारी आणखी वाढते. जर तरुण वर्ग आपले अनुकरण करत असतील तर आपली वर्तणूक आदर्शवत असली पाहिजे. आपल्या वर्तणुकीतून किंवा आपण करत जाहिरातीतून तरुणांना चांगला संदेश गेला पाहिजे याची दक्षता या सिलिब्रेटींने घ्यायला हवी मात्र अलीकडे पैशासाठी चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर आपली ही जबाबदारी विसरत चालले आहेत. जो तरुण वर्ग आपल्याला फॉलो करतो, आपल्याला आदर्श मानतो त्यांना आपण पैशासाठी काय करायला लावत आहोत याचेही भान या सिलिब्रेटींना राहिले नाही. आता हेच पहा ना ज्या चित्रपट अभिनेत्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न तरुण वर्ग करतो तेच चित्रपट अभिनेते गुटख्याची जाहिरात करून तरुण मुलांना गुटखा खाण्यास सांगत आहेत. शाहरुख खान, अजय देवगण, अक्षय कुमार यासारखे हिंदी चित्रपट सृष्टीतील सुपरस्टार गुटख्याची जाहिरात करतात आणि तरुणांना गुटखा खाण्यास सांगतात. अभिनेते पैशासाठी चुकीची जाहिरात तरुण वर्गाला व्यसनाकडे वळवत आहेत तसेच क्रिकेटरही करत आहेत. वास्तविक क्रिकेटर हे आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करतात. परदेशात गेल्यावर त्यांना आपल्या देशाचे राजदूत म्हणून ओळखले जाते. तरुण वर्गही क्रिकेट खेळाडूंचे अनुकरण करत असतात. तेच देशाचे राजदूत असलेले क्रिकेट खेळाडू पैशासाठी ऑनलाइन जुगाराची जाहिरात करत आहेत. ऑनलाइन जुगारामुळे तरुण वर्ग जुगारी तर गुटख्यामुळे व्यसनी होत आहे. आजचा तरुण हा उद्याचा नागरिक आहे. देशाचे भवितव्य तरुणांवर अवलंबून आहे हे माहीत असूनही अशाप्रकारची जाहिरात करून तरुण वर्गाला व्यसनी आणि जुगारी बनवण्याचे काम हे सिलिब्रेटी करत आहेत हा एकप्रकारचा देशद्रोहच आहे. चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर पैशासाठी अशाप्रकारचा देशद्रोह करून तरुणांचे आयुष्य उध्वस्त करत असतील तर त्यांना आदर्श का म्हणावे. अजूनही वेळ गेलेली नाही चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांनी गुटख्याच्या आणि ऑनलाइन जुगाराची जाहिरात करणे थांबवावी. पैशासाठी आपण तरुण पिढीसमोर कोणता आदर्श ठेवत आहोत याचा विचार या सिलिब्रेटींनी करावा. तुम्ही देशातील सन्माननीय नागरिक आहात. देशातील लाखो नव्हे तर करोडो नागरिक तुम्हाला आपला आदर्श मानतात त्याला तडा जाईल असे वागू नका. देशासाठी आणि देशातील तरुणांप्रति तुमचीही काही जबाबदारी आहे याचे भान ठेवून गुटख्याच्या आणि ऑनलाइन जुगारच्या जाहिराती बंद करा आणि तरुणांपुढे आदर्श निर्माण करा.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**


## त्रिभाषा धोरणाचा जीआर काढणे आणि रद्द करणे हा तर सरकारचा राजकीय डाव!

हिंदी सक्तीच्या जीआर वरून असे लक्षात येते की याचा राजकारणावर काय परिणाम पडू शकतो किंवा याचा फायदा येणाऱ्या निवडणुकीत आपल्याला किती आणि कसा घेता येईल यावर सत्ताधाऱ्यांचे लक्ष असावे.त्याचप्रमाणे सरकारने हिंदी सक्तीचा जीआर आणताच विरोधीपक्ष एक्टीव्ह मोडमध्ये आला आणि विरोधकांची मोर्चेबांधणी सुरू झाली.याच निमित्ताने दोन्ही ठाकरे गट एकत्र आल्याचे पाहून आणि ५ जुलैला मोर्चा निघणार सोबतच संपूर्ण विरोधी पक्ष एकवटल्याचे पाहून आपल्या सरकारवर हिंदी भाषेच्या सक्तीचा विपरित परिणाम होऊ शकतो आणि महायुतीमध्ये सुध्दा यावर एकमत दिसत नसल्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने त्रिभाषा धोरणाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दिनांक १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ रोजी काढण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय दिनांक २९ जूलै २०२५ ला रद्द करण्यात आले.यामुळे भाषा विवाद सध्याच्या परिस्थितीत निवळल्याचे दिसून येते.प्रथम हिंदीचा जीआर काढणे आणि नंतर सारवासारव करण्यासाठी जीआर रद्द करणे ही तर हेतूपुरस्सर राजकीय हेतूने मराठी माणसाची फसवणूकच म्हणावी लागेल. सरकारला हिंदी सक्तीचा जीआर काढण्याची काय गरज होती.आपण महाराष्ट्रात राहातो मग अचानक हिंदी भाषेचा लाड सरकारच्या हुदयात कसा काय उफाळून आला! असे अनेक प्रश्न आज मराठी माणसाच्या मनात भेडसावत आहे. यावरून स्पष्ट होते की सरकार मराठी माणसामध्ये फुट पाडण्याचा तर प्रयत्न करत तर नाही ना!असाही प्रश्न निर्माण होतो आहे.राज्यात गेल्या आठवड्यापासुन हिंदी व मराठी भाषेचा रणकंदन सुरू होते. परंतु मराठी माणूस एकवटल्याने सरकारला झुकावे लागले व हिंदी सक्तीचा जीआर सरकारला रद्द करावा लागला.परंतु यात सरकारकडुन राजकारण झाल्याचे अवश्य दिसून येईल.कारण राज्य सरकारने कोणाच्या तरी दबावाखाली हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय घेतला असावा असाही कयास लावला जात आहे.कारण राज्यात पुर्वी त्रिभाषीक पध्दत होती तीच योग्य होती ही बाब आता स्पष्ट दिसून येते. देशातील कोणतेही राज्य असो प्रथम प्राधान्य मातृभाषेलाच हवे. त्यानंतर राष्ट्रीय भाषा आणि त्यांच्या नंतर इंग्रजी किंवा इतर भाषेला प्राधान्य द्यायला हवे.आतापर्यंत मातृभाषा, राष्ट्र भाषा व नंतर इंग्रजी किंवा इतर भाषा असा क्रम पुर्वी पासुनच आहे आणि त्याचे महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यांनी सुध्दा स्विकारले आहे.राज्यात हिंदी भाषेचा विरोध मुळातच नाही. परंतु राजकीय पुढारी राजकारणाला वेगळे वळण देण्यासाठी विद्यार्थ्यांना हिंदी भाषा वेळेच्या आधी सरकार लादण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.आज देशाची उपराजधानी व औद्योगिक राजधानी म्हणून मुंबई ओळख जगभर आहे ही बाब जगजाहीर आहे. परंतु परप्रांतीयांनी मुंबईमध्ये जनुकाय मराठी भाषेवर आक्रमक केले की काय असे वाटत आहे. कारण बॉलीवूड क्षेत्र आणि हायप्रोफाइल मध्ये वावरणारे जास्तीत जास्त लोक इंग्रजी भाषेचा वापर करतात आणि परप्रांतीय लोक हिंदी भाषेचा वापर करून मराठी भाषेला डावलण्याचा प्रयत्न करतात.यामुळे याचा विपरीत परिणाम मराठी भाषेवर व मराठी माणसावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो.पुर्वी पहिली ते चौथी पर्यंत हिंदी भाषेची सक्ती नव्हती. हिंदी विषय हा पाचवीपासून सुरू व्हायचा म्हणजेच मातृभाषा परीपक्व झाल्यानंतर हिंदी भाषेचा व इतर भाषेचा विचार केला जात असे.परंतु सरकार राज्यात पहिलीच्या वर्गापासून त्रिभाषा सूत्र अवलंबून हिंदी भाषेची सक्ती आणण्याचा प्रयत्न करीत होती.परंतु सरकारचा डाव फसला आणि याचा सर्वच स्तरातून मोठ्या प्रमाणात विरोध झाल्याने सरकारला झुकावे लागले व त्रिभाषा धोरणाचे दोन्ही जीआर रद्द करावे लागले. कारण सरकारच्या या धोरणामागे एकच उद्देश असावा तो म्हणजे हिंदी भाषीक परप्रांतीयांना राज्यात उद्योग धंद्यामध्ये चालना मिळावी.आज राज्याच्या प्रत्येक मुलांना वयाच्या दहा वर्षांपर्यंत मातृभाषेचे संपूर्ण ज्ञान अवगत असायलाच हवे तेंव्हाच मातृभाषा परीपक्व होईल.जर हिंदी पहिल्या वर्गापासून लादली तर मातृभाषेवर याचा विपरीत परिणाम अवश्य होईल. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे.ज्यावेळेस मुले पहिलीपासून मराठी लिहायला, वाचायला शिकतात तेव्हा हिंदीही आपोआप लिहिता वाचता येते ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.राज्यात अनेक ज्वलंत प्रश्न आहेत ते बाजूला सारून नव्याने भाषा वाद निर्माण करून आणि त्याचा राज्यातील जनतेचा मोठ्या प्रमाणात विरोध पहाता हिंदी सक्तीचा जीआर रद्द करावा लागला.कारण राज्याच्या जनतेला सरकारने व्दीधेत टाकून ज्वलंत प्रश्नांवर सरकार पडदा टाकत आहे की काय असे चित्र दिसत होते. आता जीआर रद्द झाल्यानंतर समिती गठीत करण्याची काहीच आवश्यकता नव्हती.कारण महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणुस पहिली पासून हिंदी किंवा इतर भाषा स्विकारणार नाहीच त्यामुळे सरकारने स्थापन केलेली डॉ.नरेंद्र जाधव समिती स्थापन करून त्यांच्या अहवालाची काहीही गरज नाही कारण हा अहवाल मराठी माणुस स्विकारणार नाहीच.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत जे शैक्षणिक धोरण आहे ते अमलात राहु द्यावेत यात कोणत्याही प्रकारची तडजोड किंवा बदल नकोच.या भाषा वादामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाचा जय विजय झाला नसुन फक्त मराठी माणसाचा विजय झाला आहे. जय महाराष्ट्र!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

## आनंदी सी. के. सुब्रमण्यम



"क्रिकेट आणि लेखनप्रेमी सी.के. सुब्रमण्यम यांचा ,७ जुलै रोजी ७५ वा वाढदिवस आहे. यानिमित्ताने जाणून घेऊ या, त्यांच्या आनंदी, आरोग्यदायी जीवनाचे रहस्य"

आज महाराष्ट्र राज्यातील जेष्ठ नागरिकांची संख्या ही जवळपास १ कोटी ४0 लाख इतकी आहे.त्यातील असंख्य जण निवृत्ती वेतन धारक आहेत. परंतु सेवानिवृत्ती नंतरचा काळ कसा घालवायचा,याचा अनेकांना प्रश्न पडतो. म्हणून आपला वेळ,अनुभव समाजाच्या कल्याणासाठी वापरला तर आपल्याबरोबराच समाजाचेही भले कसे करता येऊ शकते,याचे उदाहरण म्हणजे श्री. सी. के. सुब्रमण्यम हे होत.

श्री. सी. के सुब्रमण्यम सिंडिकेट या राष्ट्रीकृत बँकेतून १५ वर्षापूर्वी वरिष्ठ व्यवस्थापक म्हणून सेवानिवृत्त झाले.वस्तुतः प्रदीर्घ काळ सेवा करून निवृत्त झाल्यावर अनेकांना प्रश्न पडतो, तो म्हणजे रिकाम्या वेळेचं काय करायचं ? पण सुब्रमण्यम यांना क्रिकेट खेळण्याची आणि वृत्तपत्रातून

लेखन करण्याची आवड असल्याने आणि त्यांनी या दोन्ही आवडी निवृत्तीनंतरही जोपासल्याने त्यांना असा प्रश्नच पडला नाही

श्री. सुब्रमण्यम चेन्नई येथे शाळेत असल्यापासून त्यांना क्रिकेटची आवड निर्माण झाली. शाळेतर्फे तसेच पुढे

महाविद्यालयाच्या संघाकडून ते खेळत राहिले.ते या संघाचे कप्तान ही होते.

सुब्रमण्यम १९७१ साली सिंडिकेट बँकेत रुजू झाले.

तिथे रुजू झाल्यावर ते बँकेतर्फे क्रिकेट खेळत राहिले.दिल्ली, चेन्नई येथे सेवा बजाविल्यानंतर त्यांची १९९५ मध्ये मुंबईत बदली झाली. प्रत्येक ठिकाणी ते क्रिकेट संघात सहभागी होत राहिले. तामिळनाडू क्रिकेट असोसिएशनतर्फे चेन्नईत अंपायर म्हणूनही त्यांनी १९८९ ते २000 पर्यंत काम पाहिले आहे. बँक स्पोर्टस् बोर्डाचे ते ४ वर्षे सचिव होते. इंडियन बँक असोसिएशनच्या अंतर्गत हे बोर्ड काम करते. त्यामुळे त्यांना भारतात वेगवेगळ्या ठिकाणी भरणाऱ्या बँकेच्या क्रिकेट स्पर्धांना जाता आले.



सुब्रमण्यम १५ वर्षांपूर्वी बँकेतून निवृत्त झाले आणि बँक सुटली. त्याच बरोबर बँकेने दिलेले वाशी येथील निवासस्थानही सोडावे लागले. त्यामुळे ते सानपाडा येथे रहावयास आले. पण क्रिकेटची आवड त्यांना स्वस्थ बसू देईना. म्हणून यावर त्यांनी अभिनव उपाय शोधला, तो म्हणजे सानपाडा येथील मैदानात क्रिकेट खेळणाऱ्या मुलांना क्रिकेटचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण देण्याचा. ऐपत असणाऱ्या मुलांकडून ते माफक फी घेत तर गरीब मुलांना मोफत प्रशिक्षण देत. मुलांना क्रिकेट शिकविण्याचा आनंद काही औरच असे ,असे ते म्हणतात.



सी. के सुब्रमण्यम यांची दुसरी आवड म्हणजे लेखनाची. गेली ५५ वर्षे ते विविध वृत्तपत्रांमधून सामाजिक समस्यांवर सातत्याने लेखन करीत आहे. विशेषतः सामान्य नागरिकांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्या ते प्रखरपणे मांडतात.१९७१ साली त्यांनी पहिले पोस्ट कार्ड वेंकट राघवन या क्रिकेटपटूविषयी लिहिले होते. ते टाईम्स ऑफ इंडियाच्या दिल्ली आवृत्तीत प्रसिध्द झाले. त्यानंतर त्यांची पत्रं विविध वृत्तपत्रात प्रसिध्द होत राहिली. लंडन मॅगझिन, क्रिकेटर इंटरनॅशनल अशा आंतरराष्ट्रीय मासिकांतूनही त्यांचे लेखन प्रसिध्द झाले आहे. २०१३ रोजी 'मिंटस् लाऊंज' या वृत्तपत्रातर्फे भारतातील ५ उत्कृष्ट लेखकांमध्ये त्यांची निवड करण्यात आली. सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघासाठी पत्र लेखन, वृत्तपत्रांमध्ये बातम्या देणे आदी कामे ते हौसेने करतात. शिवाय अन्य सामाजिक कामे करीत असल्याने वेळ पुरत नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

श्री. सुब्रमण्यम यांना दोन मुले आहेत. एक कुवेतमध्ये तर दुसरा मुंबईत त्यांच्याबरोबर राहतो. मी मुलांना क्रिकेट शिकविले तर त्यांनी मला संगणक वापरायला शिकविले याचा ते गमतीने उल्लेख करतात. मुलांनी क्रिकेट सोडले तरी मी मात्र संगणक न सोडता त्याचा अधिकाधिक वापर करीत असतो, असे ते

अभिमानाने सांगतात. पत्नी, मुलगा, सून व नातू यांच्यासह एकत्र कुटुंब असल्याने घरातील वेळही अत्यंत आनंदात व समाधानात जातो असे ते म्हणतात.

सुब्रमण्यम मूळ चेन्नईचे असल्याने तेथे त्यांचे स्वतःचे घर आहे. मात्र मुंबईच्या संस्कृतीने आपल्याला मुंबईतच खिळवून ठेवले आहे आणि इथे आपल्या हातून सामाजिक कार्यही घडते याचा त्यांना आनंद वाटतो.

ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या डिग्निटी फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या प्रमुख पुरस्काराबरोबरच त्यांना असंख्य पुरस्कार मिळाले असून पुढेही मिळत राहतील,असा विश्वास वाटतो.

**- देवेंद्र भुजबळ, ९८६९४८४८००.**

पान १ वरुन

### आंखे तो ...

समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्या सोडविण्यासाठी पाऊले उचलतील का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, शहर प्रमुख बाला परदेशी, दुर्गेश काठोटीवाले, विधानसभा संघटक दीपक रणनवरे, विजय पवार, गणेश घुगे, संदीप नाईकवाडे, दलित आघाडीचे जिल्हाध्यक्ष रविकांत जगधने, युवा सेना शहर प्रमुख दर्शन चौधरी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आमसभेच्या विषय ...

वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेकडे त्यावेळी कार्यरत असलेल्या ५ कर्मचारीपैकी श्री एस बी भवर वरिष्ठ सहाय्यक लिपिक है नियत वयोमानानुसार सेवानिवृत झाल्यानंतर त्यांचे पद समाप्त (व्यपगत) केले व संस्थेचे कामकाज पूर्ण करण्यासाठी ४ कर्मचारी पुरेसे आहेत असा ठराव घेतला. त्याला वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्यता घेतली. याप्रमाणे उपविधीमध्ये दुरुस्ती करण्यात आली. कर्मचारी सेवा नियमित दुरुस्ती केली. यापूर्वी दुरुस्तीला सुद्धा वार्षिक सर्वसाधारण सभेत आमसभेसमोर कोणताही विषय न ठेवता बोगस पद्धतीने बदलविण्यात आलेले असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या संस्थेने घेतलेले बोगस ठराव रद्द करण्यात यावेत. वार्षिक सर्वसाधारण सभेचे व्हिडिओ फुटेज काढलेले आहेत ते मागवावेत. यामध्ये कुठेही वरील विषयी चर्चा झालेली नाही हे स्पष्ट होईल. तसेच संस्थेचा वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल या तक्रारी सोबत जोडलेला असल्याचेही म्हटले असून यामध्ये कुठेही कर्मचारी सेवा नियम व सेवा सातत्य बाबत विषय पत्रिकेत नमूद नाही. बेकायदेशीर झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची चौकशी करण्यात यावी अशी मागणी सभासदांच्यावतीने करण्यात आली आहे.

निवेदनावर उद्धव एकनाथराव पवार सभासद क्रमांक ३३३३ यांची स्वाक्षरी आहे.

## दिव्यांग व्यक्तीसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, या कार्यालयामार्फत जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त दि. ७ जुलै ते १५ जुलै या कालावधीत कौशल्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ११ जुलै २०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे दिव्यांग व्यक्तीसाठी विषेष रोजगार/स्वयंरोजगार मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रामध्ये शासनाच्या विविध विभागामार्फत दिव्यांग व्यक्तीकरीता राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी रोजगार/स्वयंरोजगाराच्या विविध क्षेत्रातील संधीबाबत विभागातील/महामंडळातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. दिव्यांग व्यक्तींनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# सोयाबीन बियाणे बॅग बोगस शेतकऱ्यांची आर्थिक हानी

## तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे केली तक्रार



**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यात सिंचनाचा अभाव असल्यामुळे तालुक्यातील शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. कधी अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ असे नैसर्गिक अरिष्टे शेतकऱ्यावर सतत येतात गतवर्षी अतिवृष्टीने पिकाची दाणादाण उडाली उत्पन्नात घट त्यात मालाचे भाव गडगडल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली होती. यावर्षी शेतकरी सर्व अडीअडचणी विसरून जोमाने खरिपाची पेरणी केली असता तालुक्यातील किर्ला येथील शेतकरी रंजीत नारायण खंदारे गट न ४,४३व ,४५शेतात ३.00 हेक्टरमध्ये यशोदा सीडचे ११३५सोयाबीन वानाची ८ बॅग सदगुरु कृषी सेवा केंद्र तळणी यांच्याकडून खरेदी केल्या होत्या ज्यांचा बॅच नंबर ६५७१ या ८ बॅग पेरणी केल्या परतू ८ बॅग बोगस निघाल्यामुळे उगवल्या नाही त्यामुळे दुबार पेरणी करावी लागली माझी आर्थिक हानी झाली त्यामुळे सदरील कंपनीशी व विक्रेत्याशी संपर्क केला असता दोघेही मला प्रतिसाद देत नसून दोघांनी वर हात केले आहे संबंधित कंपनीची चौकशी करून मला माझी नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी खंदारे यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे निवेदणाद्वारे केली आहे.

> तक्रार निवारण समिती जाय मोक्यावर जाऊन पाहणी करून योग्य ती कारवाई केली जाईल
>
> **शिवदास तोटरे, कृषी अधिकारी गुण नियंत्रण**
> **तालुका कृषी अधिकारी कार्यालय मंठा**

# 'स्मार्ट गर्ल्स' शिबिरातून मुलींना आत्मचिंतन, व्यक्तिमत्त्व विकास व निर्णयक्षमतेचे प्रशिक्षण

## भारतीय जैन संघटना महिला विभागाच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**जालना । प्रतिनिधी -** मुलींना भावनिक, बौद्धिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने भारतीय जैन संघटना महिला विभागाच्यावतीने ५ आणि ६ जुलै रोजी श्री म. स्था. जैन विद्यालयाच्या प्राथमिक विभागात आयोजित दोन दिवसीय 'स्मार्ट गर्ल्स' हे प्रशिक्षण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात लातूर येथील प्रसिद्ध प्रशिक्षक चेतना जैन आणि हर्ष जैन यांनी आत्मचिंतन, व्यक्तिमत्त्व विकास आणि योग्य निर्णयक्षमतेचे प्रशिक्षण दिले.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुदेश सकलेचा, डॉ. धरम चंदजी गादीया, कचरुलाल कुंकूलोळ, गणेशलाल बोरा, विनोद मुथा, प्रविण बोरा, सुदेश बागरेचा, मुख्याध्यापिका सौ. गीता दरगड, महिला विभागाच्या जिल्हा अध्यक्षा सौ. सरिता प्रवीण कुचेरिया, उपाध्यक्षा सौ. रुही कासलीवाल, सचिव सौ. मोनिका गोलेच्छा आणि सौ. मोना सुराणा यांची उपस्थिती होती.

यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांनी आपल्या भाषणात आजच्या पिढीला मूल्याधिष्ठित आणि सजग जीवनाची दिशा देण्यासाठी अशा प्रकारच्या शिबिरांची नितांत गरज असून, भारतीय जैन महिला विभागाने ही संधी कौशल्याने उपलब्ध करून दिली आहे, असे गौरवोद्गार काढले. जिल्हाध्यक्षा सौ. सरिता कुचेरिया म्हणाल्या की, आजची तरुण पिढी झटपट निर्णय घेते, परिणामी अनेकदा त्याचा विपरीत परिणाम होतो. हे शिबिर म्हणजे त्यांच्या निर्णयक्षमतेला योग्य दिशा देणारे प्रभावी पाऊल आहे. योग्य शिक्षण, योग्य वेळ आणि योग्य मार्गदर्शन हेच यशस्वी भविष्यासाठी आवश्यक आहे. कार्यक्रमाची सुरुवात सौ. समता गोलेच्छा, सौ. मोना सुराणा आणि सौ. राखी रुणवाल यांच्या स्वागत गीताने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. मोना सुराणा, सौ. राखी रुणवाल, सौ. चित्रा सुराणा, सौ. कविता जैन, सौ. समता गोलेच्छा, कार्यकारिणी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी सौ. किरण रुणवाल, सौ. स्नेहल बारलोटा यांच्यासह विद्यार्थिनी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. चित्रा सुराणा यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार सौ. कविता जैन यांनी मानले.

## परतुर काँग्रेस कमिटीच्या नव्याने निवडीनंतर पत्रकार परिषद

# काँग्रेस पक्षाची विचारधारा गाव-वाड्या तांड्यापर्यंत पोहचविण्यासाठी कार्य करत राहणार - बालासाहेब आकात

**परतुर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यात काँग्रेस पक्षाला नव्याने बळकटी देण्याचे काम जेष्ठ नेते अन्वर बापू देशमुख यांच्या मार्गशनाखाली करणार असुण येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या पंचायत समिती जि. परिषद नगर परिषद निवडनुकी मध्ये काँग्रेस पक्ष महाविकास आघाडीतील घटक पक्षासी चर्चा करुण रणनिती ठरवणार आहे. तसेच परतुर तालुक्यातील काही नेते आपल्या राजकीय फायदा या करिता पक्ष सोडुण गेले असले तरी तालुक्यात काँग्रेस पक्षाला माणनारा मोठा वर्ग असल्याचे मत जेष्ठ नेते अन्वर बापू देशमुख यांणी व्यक्त केले या वेळी तालुका अध्यक्ष बालासाहेब आकात यांणी उपस्थित प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नाना उत्तर देताना म्हटले की काँग्रेस पक्षाची विचार धारा गाव वाड्या तांड्या पर्यत पोहचविण्याचे काम आम्ही सर्व करू तसेच शेतकरी कर्ज माफी पिक कर्ज साठी येणाऱ्या काळात जनअदोलन करण्यात आले सध्याला पक्षाची बांधणी चालू असुण येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समीती नगर परिषद निवडनुकी मध्ये महाविकास आघाडी पूर्ण ताकतीने निवडनुकी च्या मैदानात उतरेल असे मत त्यांणी प्रसार माध्यमाशी बोलताना व्यक्त केले. या वेळी जेष्ठ नेते अन्वर बापू देशमुख ता. अध्यक्ष बालासाहेब आकात ,युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष ड,विलास राठोड काँग्रेस शहर अध्यक्ष गणेश कुलकर्णी, मा.विधानसभा अध्यक्ष संतोष दिंडे सादेक बापू देशमुख , मा.सरपंच गिरी, मा. सरपंच दत्ता तरवटे , राजू काकडे आदी पद अधीकारी उपस्थित होते.



# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंतीच्या अध्यक्षपदी रवि पांडव तर सचिवपदी विनोद आठवे



**जालना । प्रतिनिधी -** सत्यशोधक साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त शासकीय विश्रामगृह येथे रविवार दि. ६ रोजी सर्वपक्षीय बैठक संपन्न झाली. या बैठकीस सर्व समाज बांधव आणि विविध पक्षातील पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

सदरील बैठक विष्णूआबा गवळी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली असून यामध्ये सर्वानुमते जयंती समितीच्या अध्यक्षपदी रवि पांडव, सचिव विनोद आठवे, उपाध्यक्ष विकी गवळी यांची निवड करण्यात आली.

यावेळी बैठकीस ज्येष्ठ नेते गोविंदराव बोराडे, संजूबाबा गायकवाड, कृष्णा पांडव, प्रभाकर घेवदे, सुरेश कांबळे, रविराज पाखरे, सचिन लोंढे, किशोर कांबळे, आकाश रणपिसे, सुनील कासार, गणेश पांडव, श्याम सराटे, प्रकाश भोसले, राम हिवाळे, विलास आठवे, साहेबराव कांबळे, सचिन कांबळे, कृष्णा भालेराव, सुनील साठे, परमेश्वर कांबळे, नितीन हिवाळे, कुलदीप जगधने, सुहास कांबळे, कुणाल रनपिसे आदींसह समाज बांधवांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# डॉल्फिन इंग्लिश स्कूल येथे आषाढी एकादशीनिमित्त दिंडी



**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेतील लहान लहान मुलांनी विठ्ठल रुक्मिणी वारकरी यांच्या वेशभूषा मध्ये टाळ मृदंग वादनावर पावली खेळत साजरा करण्यात आला. यावेळी शाळेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्रीमती कुकडे विद्या श्रीमती सय्यद नसरीन. श्रीमती पाटील भाग्यश्री. श्रीमती काळे साधना .श्रीमती उबाळे वंदना. कु सनईकर त्रिवेणी. गजानन शेळके इत्यादींनी मेहनत घेतली.

## पंढरपूर येथील वारकरी महाअधिवेशनासाठी दोन हजार वारकऱ्यांची उपस्थिती!

# देव, देश, धर्म यांच्या विरोधात षडयंत्र रचणाऱ्यांवर कारवाई करा ! - महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज

**पंढरपूर -** आषाढीवारी चालू असतांना वारीत पुणे येथे वारकर्यांवर मांस फेकण्याचा प्रकार झाला. वारीत विविध संघटना यांच्याकडून घुसखोरी चालू आहे. कुणीतरी सतत देव, देश, धर्म यांच्यावर आघात घडवून आणत आहे. याच्या मागे कोण आहे हे शोधून काढून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. आपल्या डोळ्यांसमोर अन्याय, अत्याचार होत असतांना आपण शांत बसणे योग्य नाही. एक गाल पुढे केल्यावर दुसरा गाल पुढे करा, हे आमच्या संस्कृतीत कधीच नव्हते, तर ते आपल्यावर लादण्यात आले. सत्य, धर्म, न्याय यांसाठी प्राण गेला तरी चालेल; मात्र आपण नेहमी धर्माच्याच बाजूने राहिले पाहिजे, असे आवाहन 'श्री क्षेत्र गोदावरी धाम बेट सरला'चे महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज यांनी केले. वारकर्यांच्या विविध प्रश्नांसाठी सद्गुरु श्री गंगागिरी महाराज मठ येथे ६ जुलैला वारकरी महाअधिवेशन आयोजित केले होते. या अधिवेशनासाठी २000 पेक्षा अधिक वारकरी व हिंदू भाविक उपस्थित होते.

या अधिवेशनात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी 'व्हिडिओ कॉल' करून वारकऱ्यांशी संवाद साधताना ''वारकरी आणि संतपरंपरा महाराष्ट्राचे वैभव असून सरकार नेहमी वारकर्यांच्या पाठिशी आहे'', असे आश्वासन दिले. अधिवेशनात विविध संत, महंत, मान्यवर यांनी केलेल्या तेजस्वी मार्गदर्शनानंतर संविधान दिंडीच्या नावाखाली, पुरोगामी, साम्यवादी यांची घुसखोरी वारकर्यांना मान्य नसून यापुढे त्यांनी हिंदु धर्मावर टीका केल्यास 'जशास तसे उत्तर देण्यात येईल', असा इशाराही या अधिवेशनात देण्यात आला.

श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ म्हणाले , ''शंकराचार्य यांना दीपावलीच्या कालावधीत अटक करण्यात आली. हिंदुत्वासाठी कार्य करणारे डॉ. वीरेंद्रसिंह तावडे हे कारागृहात आहेत. एकूणच हिंदुत्वावर आघात करणारी एक व्यवस्था कार्यरत असून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे डॉ. दाभोलकर हे त्यांच्यापैकीच एक होते. आम्ही नेहमीच विचारांची लढाईला त्याचा प्रतिवाद करून उत्तर देतो. असे असतांना अनेक हिंदुत्वनिष्ठांना, संतांना हत्यांच्या आरोपांखाली कारागृहात टाकण्याचे षडयंत्र रचले गेले. यापुढील काळात हे थांबले नाही, तर वारकरी संप्रदाय रस्त्यावर येऊन विरोध करेल.'' विश्व हिंदु परिषदेचे केंद्रीय सहमंत्री आणि सत्संगप्रमुख श्री. दादा वेदक म्हणाले, ''८00 वर्ष परंपरा असलेल्या वारीत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते घुसखोरी करून वारीच्या विरोधात हिंदूंच्या श्रद्धा-परंपरा यांच्यावर आक्रमण करत आहेत. हे आपण प्रत्यकाने जाणणे आवश्यक आहे. यापुढील काळात हिंदूंनी आक्रमक मानसिकता बाळगत प्रांतभेद, भाषाभेद आपण बाजूला ठेवून एकत्र यावे लागेल.''

या प्रसंगी हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगडचे राज्य संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले, ''यंदाच्या वारीत वारकर्यांसमवेत संयुक्त अभियान राबवल्यावर चांगल्या प्रकारे बदल पहायला मिळाले. हे भक्ती आणि शक्ती यांचे व्यासपीठ असून यापुढील काळात धर्मसत्तेचा अंकुश हा राजसत्तेवर असला पाहिजे,अशी स्थिती निर्माण झाली पाहिजे. सध्या परिस्थिती गंभीर असून वारकरी सप्ताहासारखे ख्रिस्ती मिशनर्यांचे येशू सप्ताह चालू झाले आहेत. त्यामुळे चालू असलेल्या पावसाळी अधिवेशनात धर्मांतरविरोधी कायदा, तसेच लव्ह जिहादविरोधी कायदा समंत झाला पाहिजे.''

अनंत श्री विभूषित शिवव्यंकटेशानंद भारती स्वामी म्हणाले



, ''यापुढील काळात जे अहिंदू आहेत त्यांची दुकाने हिंदूंच्या तीर्थक्षेत्राच्या आजूबाजूला लागता कामा नयेत आणि कुणी लावल्यास हिंदूंनी जे हिंदु धर्म, देव मानत नाहीत त्यांच्याकडून खरेदी करू नये.'' ह.भ.प. छोटे कदममाऊली म्हणाले, ''वारकरी महाअधिवेशनासारखे कार्यक्रम द्वैमासिक झाले पाहिजे. प्रत्येक किर्तनकाराने त्यांच्या कीर्तनात शेवटची ५ मिनिटे ही धर्मजागृतीसाठी ठेवली पाहिजे.'' या अधिवेशषात अधिवक्ता आशुतोष बडवे, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे ह.भ.प. नरेंद्र महाराज मस्के, ह.भ.प. नारायण महाराज शिंदे, स्वामी भारतानंद सरस्वती राष्ट्रीय वारकरी परिषदेचे ह.भ.प. मारुति महाराज तुनतुने, ह.भ.प. भगवान महाराज कोकरे यांसह अन्य मान्यवरांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. या अधिवेशनाचे सूत्रसंचालन ह.भ.प. दत्तात्रय चोरगे महाराज यांनी केले.

महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वरशास्त्री महाराज, उपाध्यक्ष ह.भ.प. मोहन महाराज शिंदे आणि सचिव ह.भ.प. नरहरी महाराज चौधरी, स्वराज्य संघाचे अध्यक्ष ह.भ.प. बाजीराव महाराज बांगर, अधिवक्ता आशुतोष महाराज बडवे, विश्व हिंदु परिषदेचे केंद्रीय सहमंत्री श्री. दादा वेदक, पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, शिवसेना आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष ह.भ.प. अक्षय महाराज भोसले, ह.भ.प. छोटे कदम माऊली, ह.भ.प. महेंद्र महाराज मस्के, अखिल भारतीय संत समितीचे प्रदेश महामंत्री स्वामी भारतानंद सरस्वती महाराज, महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे कोकण प्रांताध्यक्ष ह.भ.प. भगवान महाराज कोकरे, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे ह.भ.प. मारुति महाराज तुनतुने, ह.भ.प. पद्माकर महाराज देशमुख, हिंदु जनजागृती समितीचे सोलापूर जिल्हा समन्वयक श्री. राजन बुणगे आणि यांसह विविध संत- महंत, ह.भ.प., धर्माचार्य, हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे प्रमुख उपस्थित होते.

**धर्मरक्षणार्थ कार्यरत धर्मरक्षकांचे सन्मान !**

या अधिवेशनात डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात खोट्या खटल्यात अडकवून २ वर्षे कारागृहवास पत्करणारे, तसेच 'दाभोलकर हत्या आणि मी', आणि 'मालेगाव स्फोटामागील अदृश्य हात' हा पुस्तकाचे लेखक श्री. विक्रम भावे, वारकर्यांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे दैनिक 'सनातन प्रभात'चे वरिष्ठ वार्ताहर श्री. अजय केळकर आणि सुदर्शन वाहिनीचे वार्ताहर श्री. दीपक चव्हाण, तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संरक्षण कृती समितीचे श्री. गणेश लंके यांचा महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

वारीत होणारी नक्षलवादी, साम्यवादी यांची घुसखोरी या संदर्भात विधान परिषेदत आवाज उठवल्याविषयी शिवसेनेच्या सचिव व प्रवक्ता आमदार डॉ. मनीषा कायंदे यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले, तसेच महंत गुरुवर्य प.पू. रामगिरी महाराज यांचाशी पाठिशी ठामपणे उभे रहाण्याचा निर्धार या अधिवेशनात करण्यात आला.

अधिवेशनात करण्यात आलेले काही ठराव : पंढरपूर, देहू, आळंदी, पैठण, मुक्ताईनगर यांसह सर्व तीर्थक्षेत्रे कायमस्वरूपी मद्य आणि मांस यांपासून मुक्त करावीत; तसेच या सर्व तीर्थक्षेत्री १0 किलोमीटर परिसरात अहिंदूंच्या धर्मप्रसारावर बंदी आणावी; संत, संत-वांङ्मय, राष्ट्रपुरुष, धर्म, देवता आदींचा अवमान करणार्यांवर कठोर कारवाई होण्यासाठी ईशनिंदा प्रतिबंधक कायदा लागू करावा; संतांच्या श्लोकांचा चुकीचा अर्थ लावून वारीचे वातावरण कलुषित करणार्यांना शासनाने कायमचा प्रतिबंध करावा; गोहत्या आणि गोतस्करी रोखण्यासाठी महाराष्ट्रातील गोहत्या प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी; हिंदु युवतींचे रक्षण होण्यासाठी येत्या पावसाळी अधिवेशनात 'लव्ह जिहाद'विरोधी कायदा तात्काळ संमत करावा; इंद्रायणी आणि चंद्रभागा या नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी यांसह ११ विविध ठराव संमत करण्यात आले.

## महानगरपालिकेच्या वतीने राजेश राऊत आणि शाह आलम खान यांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** हरियाणा राज्यातील गुरूग्राम येथे नुकतंच देशपातळीवरील नगर परिषद, महानगरपालिका पदाधिकारी राष्ट्रीय संमेलन पार पडलं. देशातील वेगवेगळ्या भागातील नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष,महापौर ,उपमहापौर यांनी या राष्ट्रीय संमेलनाला हजेरी लावली.या संमेलनाला जालना महानगरपालिकेच्या वतीने माजी उपनगराध्यक्ष राजेश राऊत आणि माजी नगरसेवक शाह आलम खान यांनी हजेरी लावली आहे. या संमेलनाला लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी मार्गदर्शन केलं. अरविंद कल्याण यांनी या संमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं.

या संमेलनात लोकसभा सभापती तसेच देशपातळीवरील राष्ट्रीय नेत्यांनीही हजेरी लावली.

या संमेलनात आम्हाला वरीष्ठ नेत्यांनी लोकांची काम करण्याची पद्धत, नागरीकांसोबत साधण्याची कौशल्यकला याबाबत मार्गदर्शन मिळाल्याची प्रतिक्रिया माजी उपनगराध्यक्ष राजेश राऊत यांनी दिली. तर, आमदार आणि खासदारांना ज्या पद्धतीने विकास कामे करण्यासाठी निधी मिळतो.त्या पद्धतीने नगरसेवकांना निधी मिळावा अशी मागणी या संमेलनाच्या माध्यमातून केल्याची प्रतिक्रिया माजी नगरसेवक शाह आलम खान यांनी दिली.

दरम्यान आज दि.०७ सोमवार रोजी दूपारी तिन वा. च्या सुमारस जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्या वतीने राजेश राऊत आणि शाह आलम खान यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

## शासन निर्णयाची प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून पायमल्ली- ॲड. मगरे

### जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट जनआंदोलन - ॲड.भास्कर मगरे यांचा प्रशासनाला इशारा

**भोकरदन । प्रतिनिधी -** प्रशासनाने दलीत आदिवासी गायरान कास्तपट्टे सौरऊर्जा प्रकल्पाच्या नावाने हिसकावून घेतल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट जनआंदोलन करण्याचा इशारा शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड.भास्कर मगरे यांनी प्रशासनाला दिला आहे.

भोकरदन येथील शासकीय विश्रामगृह परिसरात माजीमंत्री तथा आमदार अर्जुन खोतकर यांच्या आदेशाने शिवसेनेच्या वतीने भोकरदन-जाफराबाद दलित आदिवासी तालूकास्तरीय भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी प्रमुख

उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यावेळी दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे म्हणाले की, विधी मंडळामध्ये लोकहिताचे बहुमताने विधायक पास करुन त्याचे रुपांतर कायद्यात होते ते शासकीय जीआर म्हणून प्रशासनाकडे अंमलबजावणीसाठी पाठविले जातात. मात्र प्रशासकीय अधिकारी शासन निर्णयाची

अंमलबजावणी न करता केराची टोपली दाखवतात. अशा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतुद करणे आवश्यक आहे. कारण शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियम पारित करुन ३५ वर्षे झाली मात्र प्रशासकीय अधिकारी शासन निर्णय गांभीर्याने घेत नाहीत. शासन निर्णय २८ नोव्हेंबर

१९९१ अधिनियम राज्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तपट्टे नियमानुकूलित करुन सातबारा उतार्याला नोंद घेण्याचे आदेश आहेत.

तसेच १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९०च्या दरम्यान महाराष्ट्रातील दलित आदिवासी कास्तपट्टे नावे करुन सातबारा देण्यात यावा मात्र प्रशासकीय अधिकारी लाच घेतल्याशिवाय शासन निर्णयावर विचार करीत नाहीत. पर्यायाने दलित आदिवासी कास्तपट्टे सातबारा मिळत नाही. उलट दलित आदिवासी कास्तपट्टे धारकांना नोटीसा देवून कायदेशिर शेतीसाठी झालेले अतिक्रमण निष्कशीत करण्याची धमकी दिली जाते. त्याला आम्ही भिक घालीत नाही. सौर ऊर्जा प्रकल्प प्रशासकीय अधिकारी दलित आदिवासी वहिती मशागत केलेल्या पिकांत उभारणी करण्याचा घाट घालीत आहेत. पोलीस बळाआधारे स्थानिक दलित आदिवासी कास्तकरांना पोलीस बळाचा वापर करुन दहशत निर्माण करुन जबरी ताबा करीत आहेत. जैनपुर कोठार येथील प्रकरण जालना येथील वरिष्ठ न्यायालयात न्याय प्रविष्ठ असतांना तसेच मौजे वाकडी येथील प्रकरण न्याय प्रविष्ठ असतांना भोकरदन तहसिलदाराने पोलीस बळ वापरुन दलित आदिवासींना मारहाण करुन घरे पाडून अत्याचार केला तसेच महाराष्ट्र शासनाचा सौरऊर्जा प्रकल्प प्रशासन चुकीच्या पद्धतीने राबवत दलीत आदिवासी भूमिहीन कास्त पट्टे पोलिस बळ वापरून ताबा करत



आहे,ही प्रशासनाची कृती लोकशाहीला धरून नक्कीच नाही. या पुढे प्रशासनाने दलीत आदिवासी भूमिहीन कास्तपट्टे बेकायदेशीर रित्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्यास जिल्हाधिकारी कचेरीवर आक्रमक जन आंदोलन करण्यात येईल.

राजूर येथील ग्रामसेवक गावातील कचरा दलीत आदिवासींच्या वाहिती मशागत केलेल्या पेरलेल्या पिकात टाकण्याचे आदेश देवून दलीत आदिवासी वर अत्याचार करीत आहे. अनेक वर्षापासून हा ग्रामसेवक या गावात असून याच गावचा रहिवासी आहे, बदली झाली तरी गाव सोडत नाही, सीईओकडून चौकशी व्हावी. आदी

मागण्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी नानासाहेब वानखेडे,अण्णासाहेब बलराज,जयकुमार खरात, प्रल्हाद साळवे, संदीप काकडे, कैलाश सुरडकर,संजय घोरपडेसह भोकरदन - जाफराबाद तालुक्यातील दलीत आदिवासी कार्यकर्ते आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.